अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २८/०२/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १०/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | अर्जुन रामतिर्थ निषाद, श्रमिक, ई दुरूस्ती विभाग, ई वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, भायखळा, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ४,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. २,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे जन्म प्रमाणपत्रामध्ये नावाची दुरूस्ती करावयाची असल्याने त्यांनी दिनांक २२/०८/२०२४ रोजी आरोग्य विभाग, ई वॉर्ड, म.न.पा., भायखळा, मुंबई याठिकाणी अर्ज सादर केला होता. सदर अर्जाची चौकशी करण्याकरीता तक्रारदार हे वारंवार नमूद कार्यालयात जात होते परंतू तेथील कर्मचारी काम करण्यास टाळाटाळ करीत होते. त्यानंतर दिनांक ०१/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांना दुरूस्ती करून नवीन जन्मप्रमाणपत्र प्राप्त झाले. परंतू सदरहू जन्मप्रमाणपत्रात तक्रारदार व त्यांचे आईचे नाव चुकले असल्याचे तक्रारदार यांना निर्दशनास आले. सदरहू बाब तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना सांगितली असता, त्यांनी तक्रारदार यांना नवीन अर्ज करण्याकरीता सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी नावात बदल होण्याकरीता नवीन अर्ज नमूद कार्यालयात सादर केला. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक २०/०२/२०२५ रोजी ई वॉर्ड कार्यालय येथे जावून चौकशी केली असता, लोकसेवक श्री. अर्जुन निषाद यांनी सदरहू काम करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ४,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २४/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २७/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. ३५००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. २,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- **श्रीमती शुभदा मोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. संतोष गुर्जर, पोलीस निरीक्षक**
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net